रयत शिक्षण संस्थेचे,

# सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

## इतिहास विभाग

**आणि**

## IQAC, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अमंलबजावणीपुढील आव्हाने"

## राज्यस्तरीय एकदिवसीय चर्चासत्र अहवाल

इतिहास विभाग आणि IQAC, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या संयुक्त विद्यमाने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणीपुढील आव्हाने" याविषयावर राज्यस्तरीय एकदिवसीय चर्चासत्र दिनांक १ ऑक्टोबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास उदघाटक म्हणून मा. अशोकराव थोरात उपस्थित होते. एमफुक्टोचे माजी अध्यक्ष. मा. प्रा. सी. आर. सदाशिवन बीजभाषक म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, शिवाजीराव राऊत, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, जितेंद्र डूबल, किसंनराव पाटील घोणशीकर, अतुल कदम, मा. शरद जावडेकर, सुकरे गुरुजी, टी. ए. थोरात, उपप्राचार्य प्रा. एस. ए. पाटील, उपप्राचार्य सौ. एम. बी. कांबळे, उपप्राचार्य नेताजी सूर्यवंशी, इत्यादी मान्यवर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करताना पायाभूत सुविधाबाबत शासनाची भूमिका स्पष्ट असायला हवी असे विचार महाराष्ट्र राज्य शिक्षण व्यस्थापन संघ मुंबई चे उपाध्यक्ष मा. अशोकराव थोरात यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शिक्षणामध्ये अग्रेसर आहे. पण काळानुसार प्रगती व्हायला पाहिजे, तशी झाली नाही. आपल्या राज्यातील मुले शिक्षणासाठी बाहेर जातात याचा विचार होणे काळाची गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे व्यवस्थापणाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहें. नवीन शैक्षणिक धोरणात आर्थिक तरतूद केली पाहिजे. सर्वांना बालवाडीपासून १२ वी पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण दिले तर गरीब श्रीमंत दरी कमी होईल. असे विचार मा. अशोकराव थोरात यांनी मांडले.

एमफुक्टोचे माजी अध्यक्ष. मा. प्रा. सी. आर. सदाशिवन आपल्या बीजभाषणात म्हणाले, महाराष्ट्राला राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, गाडगे महाराज, सावित्रीबाई फुले, अशा महान समाजसुधारकांची उज्वल परंपरा आहे. नव्याने आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत अनेक समस्या व अडथळे आहेत. राष्ट्रीय उत्पानातील ६% पेक्षा जास्त वाटा शिक्षणाच्या विकासासाठी केंद्र व राज्यसरकारने खर्च केला पाहिजे. सर्व शिक्षण व्यवस्था अनुदानित होणे काळाची गरज आहे. गरीब व श्रीमंतांच्या मुलांमधील शैक्षणिक दरी कमी करण्यासाठी शासनाने सर्व शाळा, महाविद्यालये अनुदानित केली पाहिजे. त्यासाठी शासनाचे नियोजन असणे महत्वाचे आहे.

राज्यस्तरीय परिषदेचे प्रास्ताविक व स्वागत मा. प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख नेताजी सूर्यवंशी यांनी केला. प्रा. डॉ. अभय पाटील यांनी आभार मानले.

राज्यस्तरीय परिषदेच्या समारोप सत्रास प्रमुख वक्ते मा. शिवाजी राऊत निवृत्त मुख्याध्यापक, अनंत इंग्लिश स्कूल, सातारा हे होते. तर अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय समाजवादी शिक्षक हक्क सभेचे अध्यक्ष मा. शरद जावडेकर होते. प्रमुख वक्ते मा. शिवाजी राऊत माध्यमिक शिक्षण आणि एनईपी. २०२० या विषयावर बोलताना म्हणाले की, धोरणे ही उद्दिष्टांसाठी असतात पण हे धोरण कटपेस्टचे धोरण आहे. हे शैक्षणिक धोरण उद्दिष्टांच्या अनुरूप आहे असा दावा करते पण प्रत्यक्षात शब्दांचा जंजाळ आहे. एनईपी भाषिक भ्रमाचा शाब्दिक सापळा, षडयंत्र आहे. प्राथमिक शिक्षण उद्ध्वस्त होणारे दिसते. सार्वत्रिक ब्रेनस्टोर्मिंगची गरज आहे. रयत शिक्षण संस्थेचा प्रयत्नवाद ज्ञानक्षेत्रात रुजवावा.

महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी निर्माण केलेल्या शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात एनईपी २०२० चे विश्लेषण करण्याची गरज आहे. संपूर्ण धोरणातून शुद्रातिशुद्राना किती फायदा झाला आहे किंवा होईल. शिक्षणप्रवाहाच्या बाहेर असलेल्या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले तर गुणवत्ता निर्माण होईल. असे विचार मा. शरद जावडेकर यांनी समारोप सत्रात मांडले. अध्यक्षीय मनोगतात बोलताना मा. शरद जावडेकर म्हणाले की, बालवाडी ते उच्चशिक्षण मोफत मिळू शकते. आपण या देशाचे नागरिक म्हणून त्याची मागणी करायला पाहिजे. मानवी विकासाच्या संदर्भात या देशात गांभीर्याने पहिले जात नाही. मानवी विकासाचे प्रतिबिंब एनईपी मध्ये आहे काय? शाहू फुल्यांनी ज्या सामाजिक न्यायाचा आग्रह धरला त्यानुसार शैक्षणिक धोरण करावे. भांडवलशाही मूल्यव्यवस्था एनईपी मध्ये दिसते.

समारोप सत्रास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. ॲड. रविंद्र पवार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, विविध कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. समारोप समारंभाचे प्रास्ताविक उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख प्रा. नेताजी सूर्यवंशी यांनी केले. आभार प्रा. लखन गौडदाब यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ.प्राजक्ता निकम यांनी केले.

**फोटो**




कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. मोहन राजमाने मान्यवरांचे स्वागत करताना




कार्यक्रमातील मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक करताना उपप्राचार्य आणि इतिहास विभागप्रमुख प्रा. सूर्यवंशी सर एन. आर.




कार्यक्रमाचे उदघाटक मा. अशोकराव थोरात उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य शिक्षण व्यवस्थापन संघ मुंबई




प्रो. डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिष्ठाता, कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.




कार्यक्रमामधील उपस्थितांना मार्गदर्शन करताना मा. ॲड. रविंद्र पवार, सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा.




समारोप सत्राचे प्रमुख वक्ते मा. शिवाजी राऊत, निवृत्त मुख्याध्यापक, अनंत इंग्लिश स्कूल, सातारा, माध्यमिक शिक्षण आणि एनईपी. २०२० याविषयावर विचार मांडताना